# मुंबईच्या विकासाला बराच वाव!

मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी) - मुंबईत अजूनही मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या गेल्या पाहिजे. मेट्रोचे जाळे, जलमार्ग, रस्ते, जलशुद्धीकरण, नवी मुंबई विमानतळ, जुन्या इमारतीचा आणि झोपड्यांचा पुनर्विकास हे प्रश्न मार्गी लागले तर मुंबईच्या विकासाला अजूनही बराच वाव असल्याचे मत एशिया सोसायटी आणि एईकॉमने आयोजित केलेल्या 'इमॅजिन २०६० : इमॅजिन मुंबई' या चर्चासत्रात मान्यवरांनी व्यक्त केली.

स्वातंत्र्योत्तर काळातील बदलत्या मुंबईचा वेध बिल्डर निरंजन हिरानंदानी यांनी घेतला. ते म्हणाले, 'बदलत्या काळाप्रमाणे मुंबई बदलली. पण मुंबईच्या पायाभूत सुविधांचा काळाप्रमाणे बदल झाला नाही. चीन आणि हिंदुस्थानमधील शहरांमध्ये पायाभूत सुविधांमध्ये बऱ्याच प्रमाणात वाव असल्यामुळे येत्या काळात या दोन देशांमध्ये जग गुंतवणूक करेल. त्यामुळे मुंबईच्या विकासालाही मोठ्या प्रमाणात वाव आहे.'

## एशिया सोसायटी आणि एईकॉमचे चर्चासत्र



▪ *पायाभूत सुविधांचा विकास करताना शहरी माणसाकडे दुर्लक्ष करण्यात येत आहे. शहरांचा विकास हा देशाचे अर्थकारण बदलणारा आहे, ही बाब सरकारने लक्षात घ्यावी, असे मत शहर अभ्यासक-विकासक गोर्डन फालकोनर, इशर आहलुवालिया, एईकॉमचे सीन शिईओ, बंटी चंद आणि रुबेन अब्राहम यांनी व्यक्त केले.*

### मेट्रो रेल्वे शहरांचा चेहरा बनलाय!

जगभरात मेट्रो रेल्वे त्या त्या शहरांचा चेहरामोहरा बनल्या आहेत. इथेही मेट्रोचे जाळे मुंबईच्या कानाकोपऱ्यात पोहोचणार आहे. त्यामुळे मुंबई मेट्रो मुंबईचीही ओळख बनेल. मुंबईत काही बिझीनेस सेंटर तयार करण्यात आले. मात्र, ही सेंटर्स सार्वजनिक वाहतुकीशी जोडण्यात प्रशासनाला अपयश आले, असे मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालिका अश्विनी भिडे म्हणाल्या. पूर्वी ट्राम आणि मिलच्या बाजूला असलेल्या चाळीमुळे कामगार आणि कर्मचाऱ्यांच्या प्रवासाचा प्रश्न सुटला होता. आता मात्र तो बिकट झाला आहे. मुंबई मेट्रोमुळे हा प्रश्न काही अंशी सुटेल, असेही त्या म्हणाल्या.